# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १२/१२/२०२१ (रविवार)

---

## —: जबरी चोरी :—

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :— अंतर्गत २ किमी अंतरावर मौजा कृष्णा नदी जवळ गांगापुर टाकळघाट येथे दिनांक ११/१२/२०२१ चे १८/०० ते १८/१५ वा.दर. १) आकाश कारेमोरे २) सोनु गायकवाड दोन्ही रा.गांगापुर झोपडपट्टी टाकळघाट हे मोटार सायकल डीओ मोपेड क्र. एमएच—४० बीव्ही ८३४१ ने येवून संगनमत करुन सजंय बलवंत राय रा.कटरे कॉलोनी टाकळघाट प्लॉट नं.३६ यांना लोखंडी कोयताचे धाक दाखवुन शिवीगाळ करुन त्यांचे खिश्यातील नगदी ७००/रु व हातातील घडयाळ कि.१८००/रु असा एकुण २५००/रु माल बळजबरीने हिसकावुन पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी सजंय बलवंत राय वय २७ वर्षे रा.कटरे कॉलोनी टाकळघाट प्लॉट नं. मो.नं. ९७३०१५२५६८ यांचे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी १) आकाश कारेमोरे २) सोनु गायकवाड दोन्ही रा.गांगापुर झोपडपट्टी टाकळघाट विरुध्द पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अप क्रमांक ३२१/२१ कलम ३९२,५०४,३४, भादवि सह कलम ४/२५ आर्म ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास मपोउपनि रेजीवाड मो.९८३४८२५७९३ हे करित आहे.

## —: घरफोडी :—

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत २ किमी अंतरावर लक्ष्मी भोजनायलजवळ सीर्सीकर कॉम्प्लेक्स उमरेड येथे विलास महादेवराव सुभेदार रा.उमरेड हे एस बी आय चे ग्राहक सेवा केंद्र चालवितात दिनांक ५/१२/२१ रोजी १७/०० वा. आपल्या सेंटरला आले आणि बॅकेचे शिल्लक काम केल्यानंतर रात्री ०८/०० वा. चे सूमारास घरी परत गेले या दरम्यान व्यवहाराचे रक्कमेतुन ८९००० रू काढुन कपाटात ठेवले ती रक्कम जी सेंटर बंद करतांना त्यांचे ध्यानात न आल्याने सोबत नेले नाही. कपाटात कॅश ठेवत नसल्यामूळे कुलुप पण लावण्यात आले नाही. फक्त टेबलच्या ड्रावरची रक्कम बॅगमध्ये भरून मूख्य दरवाजाला कुलुप लावुन घरी गेले.दि ६/१२/२१ ला १०/०० वा. सेंटरला गेले असता कंपाऊडचे गेटला लावलेले कुलुप उघडले होते ते आत गेले असता सेंटरच्या दरवाजाचे कुलुप दिसले नाही फक्त कडी खाचे मारलेली कडी दिसली बाहेर दरवाजाचे कुलुप व कुलुप तोडण्यासाठी वापरलेली छोटी सळाख पडलेली दिसली आलमारीच्या ड्रावरमधील आदल्या दिवशी ठेवलेले ८९,००० रू दिसले नाही. सदर रक्कम कोणीतरी अज्ञात इसमानी चोरुन नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी विलास महादेवराव सुभेदार रा.उमरेड वय ३९ मो क्र ९६३७७५३७३९ यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. उमरेड येथे अप क्रमांक ७९३/२१ कलम ४५७,३८० भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पो हवा.आशिश खोडे मो क्र ९४२३६०५०७१ हे करित आहे.

## —: चोरी रेती :—

पो.स्टे. काटोल :— अंतर्गत १० किमी अंतरावर विठठल रूक्मीणी मंदिर जवळ पारडसिंगा, येथे दिनांक ११/१२/२१ चे ०२/१७ वा. ते ०३/०२ वा. पोलीस स्टेशन काटोल चे पथक नाईट गस्त करित असतांना ट्रक्टर क्र एम.एच. ४० एम. १८८ ज्याची ट्राली क्रं. एम. एच. ४० एम. २५९५ चा चालक हा रेती घेवुन जात असता पोलीसांनी ट्रक्टर थांबवून रेती बाबत परवाना विचारला असता परवाना नसल्याचे सांगितले. ट्रक्टर मध्ये अंदाजे ०१ ब्रास रेती किंमती

५००० रू. आढळुन आली. ट्रक्टर क्र एम.एच. ४० एम. १८८ ज्याची ट्राली क्रं. एम. एच. ४० एम. २५९५ किंमत अंदाजे किंमत ३,५००,००/—रू. असा एकुण ३५५०००/— रू.चा माल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी पोहवा श्रीनीवास वाघ ब नं. ६९८ पोस्टे काटोल मो नं. ९८२३३४८३७४ यांचे लेखी रिपोर्ट वरुन आरोपी चालक प्रमोद भालचंद्र आगरकर याचे विरुध्द पो.स्टे. काटोल येथे अप क्रमांक ६४९/२१ कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सपोनि राहूल बोंद्रे मो न ९८२३९०४१४१ हे करित आहे.

## —: चोरी मोटार सायकल :—

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत १२ किमी अंतरावर गोंडखैरी येथील वन्डर्स ऑफ वर्ड हॉटेल चा कर्मचारी अनमोल रघु बेदी वय २१ रा. मेकोसाबाग क्रिश्चन कॉलोनी नागपुर हा दिनांक ०९/१२/२१ रोजी रात्री आपली डयूटी करुन रात्री स्टाफ रूम वर परत आला व आराम करायला गेला त्यांनी त्याची मो. सा. क्र. एमएच ४९ डी.सी. ८११० ही हॉटेलच्या स्टॉफ रूम च्या समोर लॉक करून उभी ठेवली सकाळी त्यास त्याची मोसा दिसली नाही शोध घेतला असता मिळुन आली नाही शोध दरम्यान त्यांनी पेट्रोल पंप येथील सीसीटीव्ही फुटेज चेक केले. असता अकीलेश मोतीलाल पटले रा. उगली थाणा ईमली टोला जिल्हा सिवणी हा मोसा घेवून जातांना दिसला

सदर प्रकरणी फिर्यादी अनमोल रघु बेदी वय २१ रा. मेकोसाबाग क्रिश्चन कॉलोनी नागपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी अकीलेश मोतीलाल पटले रा. उगली थाणा ईमली टोला जिल्हा सिवणी याचे विरुध्द पो.स्टे. कळमेश्वर येथे अप क्रमांक ६९४/२०२१ कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोहवा प्रकाश उईके मो.नं.. ९८२३३२४८२६ हे करित आहे.

## —: लग्नाचे आमिष दाखवून शारीरीक शोषण :—

पो.स्टे. उमरेड :— पोलीस स्टेशन उमरेड येथे दिनांक ११/१२/२१ रोजी फिर्यादी यांनी हजर येवून आपली रिपोर्ट नोदविली की तिचे लग्न मार्च २०१५ मध्ये रितीरिवाजाप्रमाणे झाले लग्नानंतर पतीपासुन मूलबाळ झाले नाही. पती काही दिवस चांगले राहीले नंतर दारूचे व्यसन लागल्याने दारू पिवुन त्रास देउ लागला. फिर्यादीचे घराशेजारी राहणारा सयमुद रघुनाथ राजपुत घरी येवून बोलला की तुझा पती दारू पिवुन त्रास देतो तु नवरा सोडून दे मी तूझें सोबत लग्न करतो. त्याने फिर्यादीला खोटे आश्वासन देवून प्रेमाचे जाळयात फसवले नव—याच्या त्रासामुळे फिर्यादीने त्याची गोष्टी एकुण घेतली. त्यानंतर सयमूद हा फिर्यादीला शारीरीक संबधासाठी जबरदस्ती करू लागला ती त्याला टाळाटाळ करीत होती दि १५/९/१९ रोजी ०७/०० वा फिर्यादीचे पती शिकारीसाठी गेले असता सयमूदने ०९/०० वा. फिर्यादीला घरी नेले व शारिरीक संबध केले ती माहेरी गेली असता दोन वर्षापासुन लग्नाचे आमिष दाखवून पतीचे घरी नोव्हेंबर २०२० मध्ये अनेक वेळा शारीरीक संबध केले. तसेच २०२० डिसेंबर मध्ये दहेगाव जवळील सागवणीमधे तीचेसोबत शारीरीक संबध केले.माहेरी गेल्यावर मार्च २०२१ मधे तसेच त्यानंतर अनेक वेळा तो तीचे आइचे घरी यायचा व आइचे घराचे स्लॅपवर घेउन जावुन शारीरीक संबंध केले आहे.फिर्यादीने सयमुद चे मताप्रमाणे दि.१५/११/२१ रोजी गावातील पंचकमेटी समोर पतीसोबत सोड चीठ्ठी केली. फिर्यादीने सयमुद ला म्हटले की तूझे ऐकूण मी सोडचीटटी घेतली तू माझेसोबत लग्न कर त्यांनी लग्न करण्यात नकार दिला.

सदर प्रकरणी फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी सयमुद रघुनाथ राजपुत याचे विरुध्द पो स्टे. उमरेड येथे अप क्रमांक अप क्र ७९२/२१ कलम ३७६ भादवी अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास मसपोनी खोब्रागडे मो क्र ८३०८०८२०९४ हे करित आहे.

## —: पळवून नेणे :—

पो.स्टे. बोरी :— पोलीस स्टेशन खापरखेडा येथे दिनांक ११/१२/२०२१ रोजी फिर्यादी हिने आपली तोंडी नोदविली की तिची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी हिचे चिन्टु बावरी वय अंदाजे २३ वर्ष रा सातगाव जयपुर झोपडपटटी ता हींगणा जि नागपुर सोबत प्रेमसंबध होते दिनांक १०/१२/२०२१ रोजी मुलगी एकटी घरी हजर बसता तिने घरातले दागदागिने व तिचे कागदपत्र घेवुन चिन्टु बावरी सोबत निघुन गेली. चिन्टु बावरी वय अंदाजे २३ वर्श रा सातगाव जयपुर झोपडपटटी ता हींगणा जि नागपुर याने फिर्यादीच्या मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याची पोस्टेला येवुन तक्रार दिल्याने पोस्टेला गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी चे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी चिन्टु बावरी वय अंदाजे २३ वर्ष रा सातगाव जयपुर झोपडपटटी ता हींगणा जि नागपुर याचे विरुध्द पो.स्टे. बोरी येथे अप क्रमांक ५६४/२०२१ कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पळवून नेलेली मुलगी व आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. पुढील तपास सॅफौ धवराळ मो नं 9765497005 हे करित आहे.

## —: ऑन लाईन फसवणुक :—

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत सिल्लेवाडा येथील वार्ड नं ४, मस्जिद चे मागे चे निवासी धमेंद्र राधाकृष्ण यादव मोबाईल मध्ये ३ महीण्या अगोदर बेटवे नावाचा गेमींग ॲप डाउनलोड केला, व त्या ॲप मध्ये दि.०५.१२.२१ रोजी फिर्यादीने ८००० रू डीपॉझीट करून बेटवे गेमींग ॲप ने ८००० रू चे बदल्यात १००१०२ रू खात्यात जमा झाल्याचे डिसप्ले करून व ते विड्रॉल करण्याकरीता फिर्यादीस त्याचे बॅकचे डिटेल, आधार कार्ड नंबर व बॅकेची ३ महीण्याचे स्टेटमेट मागवुन फिर्यादीस आलेला ओटीपी बेटवे नावाचा गेमींग ॲपने शेअर करण्यास सांगुन त्यांनी ते शेअर केले. दि.०९.१२.२१ रोजी बेटवे नावाचा गेमींग ॲप ने फिर्यादीचे युको बॅकचे अकाउंट मध्ये १,००,१०२ रू डीपॉझीट केले व नंतर लगेच फिर्यादीचे अकाउंट मधुन क्रमशः १०,०००रू, ४००००रू,१,००,००० रू, २५,००६रू, १५,००६रू, ५००००रू, ५००००रू, २५,०००रू, २५,०००रू, ५००००रू, ५००००रू, १,००,०००रू असे ५,४०,०१२ रू व दि.१०.१२.२०२१ रोजी क्रमशः ३५,०००रू, २०,०००रू, ५०,०००रू, ५०,०००रू असे १,५५,००० रू असे एकुण ६,९५,०१२ रू फिर्यादीचे बॅक खात्यातुन काढुन फिर्यादीची फसवणुक केली,

सदर प्रकरणी फिर्यादी धमेंद्र राधाकृष्ण यादव वय्र १९ वर्ष, रा.वार्ड नं ४, मस्जिद चे मागे, सिल्लेवाडा मो न ९५०३१८३९०९ यांचे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. खापरखेडा येथे ५१०/२१ कलम ४२० भादवी.सह कलम ६६ डी. आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोनी भटकर सा पोस्टे खापरखेडा मो न ७७७४०३१०७० हे करित आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर